**सं.फौ.ख.क्र.१५०७२/२०२०**

**निशाणी ८ खाली**

**आरोपीतर्फे वकील श्री. पी. बी. अग्रवाल यांच्यामार्फत साक्षीदार क्र.१ नामे सिमा बंडुसिंग ठाकूर यांचा उलटतपास शपथेवर सुरू.**

हे म्हणणे खरे नाही की, सदरचे सिलेंडर हे गैरकानूनी नव्हते. साक्षीदार स्वतहून सांगते की, मला ते गैरकानूनी वाटले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी मोठे ते लहान सिलेंडर भरतांना कोणालाही पाहिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, लहान सिलेंडर विकण्याकरिता कोणताही परवाना लागत नाही. हे म्हणणे खरे आहे की, ते सिलेंडर बाजारामध्ये सहजरित्या मिळतात. हे म्हणणे खरे आहे की, जसे कंपनीमधून सिलेंडर येतात तसेच ते विकले जातात. हे म्हणणे खरे आहे की, सिलेंडर भरून देणे याचा अर्थ असा होतो की, ते सिलेंडर बदलून देतात. हे म्हणणे खरे नाही की, सिलेंडर विकण्याकरिता व ठेवण्याकरिता परवाना आवश्यक असतो. हे म्हणणे खरे आहे की, मी सुविधा व युनीक कंपनी यांच्या विरूध्द कोणतीही कारवाई केली नाही. मी पोलीसांना बयान देतेवेळेस अवैध काळाबाजार होत असल्याबाबत सांगितले होते. परंतु, सदरची बाब माझ्या बयानामध्ये नमूद केलेली नाही. ती पोलीसांनी का नमूद केलेली नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासामध्ये दोन वेळेस घटनास्थळी गेलेबाबत सांगितले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दिलेली तक्रार अशी घडली नव्हती. साक्षीदार स्वतःहून सांगते की, कुठल्याही प्रकारे स्फोट होवू नये व दुर्घटना होवू नये याकरिता काउंसलींग करत होते तसेच आम्हाला सदरचे प्रकरण न्यायालयामध्ये न्यायचे नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

RAHUL KESHAVRAO GAIKWAD

Digitally signed by RAHUL KESHAVRAO GAIKWAD
Date: 2025.02.28 10:29:43 +0530

(राहूल के. गायकवाड)

दिनांकः– २७.०२.२०२५

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, (न्यायालय क्र.१),

नागपूर.